**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१७/०८/२०२६

समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग

***ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक उपकरणांचे वाटप करणे कामी तपासणी शिबिर संपन्न***

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वसई विरार शहर महानगरपालिका समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग तसेच भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री दिव्यशा केंद्रामार्फत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' बोळींज, 'सी' चंदनसार व 'ई' नालासोपारा (प.) या प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी सहाय्यक उपकरणे मोफत वाटप करण्याकामी दि.१५ ऑगस्ट २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या तपासणी शिबीराचे उद्घाटन मा.महापौर श्री.अजीव पाटील व मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) महोदयांच्या हस्ते करण्यात आले.

या तपासणी शिबिराचा मुख्य उद्देश ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक अडचणी व विशेष गरजा ओळखून त्यांना आवश्यक सहाय्यक उपकरणे मोफत उपलब्ध करून देणे हा आहे. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांची तज्ज्ञांकडून तपासणी करून त्यांच्या गरजेनुसार योग्य उपकरणांची निवड करण्यात येते. चालण्यास अडचण असलेले, ऐकण्याची समस्या असलेले किंवा दैनंदिन हालचालींसाठी इतरांच्या मदतीची आवश्यकता असलेले ज्येष्ठ नागरिक यांना आवश्यक साधने संस्थेमार्फत उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. याद्वारे ज्येष्ठ नागरिकांना व्हीलचेअर, वॉकर, श्रवणयंत्र, चालण्यासाठीची काठी, ट्रायपॉड इ.सारखी सहाय्यक उपकरणे संस्थेमार्फत देण्यात येणार आहेत. प्रभाग समिती 'ए', 'सी' व 'ई' कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी महानगरपालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या तपासणी शिबिरामध्ये ५३ ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. त्यापैकी पात्र ३७ गरजू ज्येष्ठ नागरिकांना संस्थेमार्फत विविध सहाय्यक उपकरणे देण्याबाबत तपासणी शिबिरामध्ये नोंद घेण्यात आली. यापुढेही इतर प्रभाग समिती कार्यक्षेत्रातही सदर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून संबंधित संस्थेमार्फत गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोफत सहाय्यक उपकरणे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या शिबिरास मा.आमदार श्री.राजन नाईक, मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, मा.आजी-माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, उप-आयुक्त (समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग) डॉ.करुणा जुईकर, महानगरपालिकेचे सर्व उप-आयुक्त, सहाय्यक आयुक्त, सहा.आयुक्त (समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग) श्रीम.नीलाक्षी पाटील, एलिम्को संस्थेचे अधिकारी-कर्मचारी, लाभार्थी ज्येष्ठ नागरिक व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.